# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २६/०४/२०२४ (शुक्रवार) सकाळ

---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
### वाहनासह एकुण ४१,००,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
### नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक २५/०४/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे रामटेक हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधारांकडून माहीती मिळाली की, रामटेक मनसर रोडवर शितलवाडी परीसरात दोन टाटा कंपनीचे एल पी ट्रक मध्ये अवैध्यरित्या रेती भरुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या विश्वसनिय माहीतीवरून स्टाफ यांनी नाकाबंदी करून १) ट्रक क्र. MH-49/BZ-0357 चा चालक **आरोपी नामे—शाहिद खान आयात खान वय ३० वर्ष, रा. ताज नगर ०२, ता. जि. अमरावती** याने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये १० ब्रास रेती किंमती ५०,०००/—रू. २) ट्रक क्र. MH-27/BX-9799 चा चालक **आरोपी नामे— अमीन शाह कलंदर शाह, वय ४२ वर्ष, रा. हैदरपुर ता. जि. अमरावती** यांनी आपल्या ताब्यातील वाहनामध्ये १० ब्रास रेती किंमती ५०,०००/—रू. ची अवैधरीत्या विनापरवाना वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपींच्या ताब्यातून १) ट्रक क्र. MH-49/BZ-0357 किंमती २०,००,०००/—रू. व त्या ट्रकमध्ये १० ब्रास रेती किंमती अंदाजे ५०,०००/—रू. तसेच २) ट्रक क्र. MH-27/BX-9799 किंमती २०,००,०००/— रू. मध्ये १० ब्रास रेती किंमती अंदाजे ५०,०००/—रू. दोन्ही वाहनामधील एकुण २० ब्रास रेती किंमती १,००,०००/—रू. असा एकुण ४१,००,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **आरोपी १) शाहिद खान आयात खान वय ३० वर्ष, रा. ताज नगर ०२, ता. जि. अमरावती २) अमीन शाह कलंदर शाह, वय ४२ वर्ष, रा. हैदरपुर ता. जि. अमरावती ३)** ट्रक क्र. MH-49/BZ-0357 **चा मालक नामे— नदीम बेग काझी रा. अमरावती ४)** ट्रक क्र. MH-27/BX-9799 चा मालक **शोहेब अहमद रा. अमरावती** याचे विरुध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३७९, १०९, ३४ भादंवि सहकलम ४८ (७), ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६, सहकलम ४, २१ खानी खनिजे (विकास आणि नियमन) अधि. १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक किशोर शेरकी, पोना प्रणय बनाफर, पोअं बालाजी बारगुले, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी विशेष पथक नागपूर ग्रामीण तसेच पो.हवा. रोशन काळे, प्रमोद भोयर, नितेश पिपरोदे, पो.ना. विरेंद्र नरड, विपीन गायधने यांनी केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर